जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

4 DEC 2017
लोकमत

# 'वेब पोर्टल'द्वारे परीक्षाविषयक माहिती

## शिवाजी विद्यापीठाचे नवे पाऊल; विद्यार्थी, प्राध्यापक, महाविद्यालयांना ठरणार उपयोगी

**संतोष मिठारी** ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून आता वेब पोर्टलद्वारे परीक्षाविषयक सूचना आणि माहिती दिली जाणार आहे. विद्यापीठाच्या मुख्य संकेतस्थळाशी हे नवे पोर्टल संलग्नित असणार आहे. डिसेंबर अखेरपर्यंत ते कार्यान्वित होणार आहे.

परीक्षाविषयक कामकाजात जास्तीत जास्त प्रमाणात माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या उद्देशाने सिक्युर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एसआरपीडी, गोपनीय व नियंत्रित पद्धतीने प्रश्नपत्रिका वितरण), ऑनलाईन निकाल, डिजिटल प्रमाणपत्राची सुरुवात परीक्षा मंडळाने केली आहे. याअंतर्गत आणखी एक नवे पाऊल म्हणून आता या मंडळाचे वेब पोर्टल सुरु होणार आहे. परीक्षाविषयक सर्वप्रकारच्या सूचना, वेळापत्रके, अर्ज आदींचे आदान-प्रदान करण्यासाठी या पोर्टलचा वापर होईल. परीक्षेबाबतची माहिती संकलित करणे, त्यावर प्रक्रिया करणे आदी कामे देखील याद्वारे होतील. पोर्टलमध्ये आधुनिक पद्धतीने माहिती प्रकाशित होणार आहे. विद्यार्थी, महाविद्यालये, परीक्षा, दूरशिक्षण विभाग आणि पदवी, पदव्युत्तर, एम.फील., पीएच.डी. असे वर्गीकरण असणार आहे. त्यामुळे यातून हवी ती माहिती शोधणे सहज शक्य होईल. यामध्ये परीक्षांचे वेळापत्रक, अंतिम दिनांक आदी माहिती ठळक स्वरुपात दिसणार आहे. ई-मेल, एसएमएसद्वारे परीक्षेचे वेळापत्रक, अर्जाची मुदत यांची माहिती पाठविता येणार आहे.

### डिसेंबर अखेरपर्यंत कार्यान्वित



सध्या परीक्षाविषयक सूचना प्रकाशित करण्यासाठी (online.shivajiuniversity.in) या नावाने एक वेबपेज कार्यरत आहे. त्यातून हवी ती माहिती शोधणे थोडे अवघड ठरत आहे. त्यामुळे परीक्षाविषयक कामकाजातील गोपनीयता, काटेकोर कालबद्ध अंमबजावणी या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन या नव्या वेबपोर्टलचा वापर केला जाणार असल्याचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले. ते म्हणाले, परीक्षेबाबतची सर्व माहिती, सूचना विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे पोर्टल उपयुक्त ठरणार आहे. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली या वेब पोर्टल निर्मितीचे काम सुरु आहे. डिसेंबर अखेरपर्यंत ते कार्यान्वित केले जाईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# हिंदीचा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार

**कोल्हापूर टाइम्स टीम**



भाषाअभ्यासाला कौशल्याची जोड देत रोजगाराभिमुख दिशा देणाऱ्या अभ्यासक्रमाची रचना करत शिवाजी विद्यापीठात हिंदी विषयामध्ये नवीन अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. भविष्यात भाषेच्या विद्यार्थ्यांना कथा पटकथा लेखक, अनुवादन, दुभाषक, प्रशासनातील भाषेशी संबंधित अधिकारी असा विविध क्षेत्रात करिअर करता यावे यासाठी भाषेला कौशल्यविकासाची जोड देण्यात येणार आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून तयार करण्यात आलेला हिंदी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना रोजगाराच्या हजारो संधी देणारा ठरणार आहे. सिनेमा इंडस्ट्रीमध्ये हिंदी भाषेतून कथा, पटकथा, संवाद लिहिण्यासाठी प्रचंड मनुष्यबळाची गरज आहे. तसेच जाहीरातीचे प्रादेशिकीकरण होत असल्यामुळे भाषांतरासाठीही हिंदीच्या विद्यार्थ्यांना संधी खुल्या झाल्या आहेत. तसेच साहित्यकृतीवर आधारीत लघुपटाची निर्मितीही विभागातर्फे करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत हिंदीच्या सक्षमीकरणासाठी निधी मंजूर झाला आहे. यामधून पदव्युत्तर अभ्यासक्रमासोबत संगणक तथा भारतीय भाषा सॉफ्टवेअर पदविका हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. भाषा तज्ज्ञ, विश्लेषक भाषांतरकार या क्षेत्रात विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे.